भारतीय सौर २३ फाल्गुन १९४५
अमरावती,बुधवार दि. १३ मार्च २०२४

हिंदुस्थान

विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन १५ मार्चपासून बंद

सोलापूर दि. १२ : पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनात बदल करण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला आहे. येत्या १५ मार्चपासून सुमारे दीड महिना विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन बंद राहणार आहे. या कालावधीत भाविकांना केवळ मुखदर्शन घेता येणार आहे. मुखदर्शनासाठी सकाळी ६ ते ११ अशी पाच तासांची वेळ निश्चित करण्यात आली आहे. १५ मार्चपासून हे नवीन नियम लागू होणार आहेत. सध्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील संवर्धन आणि सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. यासाठी राज्य सरकारने ७३ कोटी रुपये मंजूर केले आहेत. मंदिराच्या गर्भगृहातील काम सुरू करण्यासाठी विठ्ठल रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन बंद ठेवावे लागणार आहे. या संदर्भात आज मंदिर समितीची बैठक पार पडली. या बैठकीत विठ्ठल-रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन १५ मार्चपासून सुमारे दीड महिना बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. १५ मार्चपासून भाविकांनी सकाळी ६ ते ११ या वेळेत मुखदर्शन घेता येणार आहे. याबाबत मंदिर समितीने सांगितले आहे की, दररोजचे देवाचे नित्य उपचार सुरू राहणार आहेत.

गुंतवणूक परिषदेत ११५० कोटींचे सामंजस्य करार

उद्योगासाठी जिल्ह्यात तात्काळ सिंगल विंडो सुरू करणार : जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

बुलढाणा दि. १२ : जिल्हा गुंतवणूक परिषदेत ४५ उद्योजकांनी १ हजार १५० कोटी रूपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी पोषक वातावरण आहेत. विविध क्षेत्रात गुंतवणूक वाढावी यासाठी जिल्हा उद्योग केंद्रात सिंगल विंडो प्रणाली सुरूवात करण्यात येणार आहे. याचा जिल्ह्यात गुंतवणूक वाढीसाठी मदत होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी व्यक्त केला.

आज जिल्हा गुंतवणूक परिषद पार पडली. यावेळी उद्योजक राधेश्याम चांडक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजेश इंगळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुनील पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, औद्योगिक परिसरात जागा देण्यापासून उत्पादनाचे मार्केटींग आणि ब्रँडींगसाठी राज्य शासनाकडून मदत देण्यात येत आहे. जिल्ह्यात सुपीक जमीन असून प्रामुख्याने कृषि आधारीत उद्योग उभारण्यास संधी आहे. कृषि उत्पादनांबाबत मुल्यवर्धन साखळी निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना याचा निश्चितच फायदा होईल. जिल्हा पातळीवर तयार झालेल्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळाल्यास ही उत्पादने जागतिकस्तरावरही जातील. जिल्ह्यातील बचतगटांसाठी राजमाता या ब्रँडची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे याला वैश्विक ओळख मिळण्यास मदत होईल.

कोणतेही उत्पादन ग्राहकांच्या पसंतीस उतरण्यासाठी पॅकेजिंग, ब्रँडींग, पोषक तत्वे, किफायतशिर किंमती हे सर्व घटक महत्वाचे आहे. जिल्ह्यातून गुणवत्तापूर्ण उत्पादने निर्यात होत आहे. गेल्या वर्षी सुमारे ७५० कोटी रूपयांची उत्पादनांची निर्यात झाली. उद्योग उभारणी आणि निर्यातक्षम उद्योग उभारणीसाठी नवउद्योजकांनी पुढाकार घ्यावा. जिल्ह्यात समृद्धी महामार्ग, शक्तीपिठ जोडणारा मार्ग यामुळे उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे दैनंदिन गरजेच्या वस्तू दूरच्या ठिकाणावर कमी वेळेत पोहोचणे शक्य झाले आहे. वाहतूक क्षेत्रातील उद्योजकांनी या पायाभूत सुविधांचा लाभ घ्यावा. जिल्ह्यात जागतिक किर्तीची पर्यटन स्थळे आहेत. या क्षेत्रात उद्योगांना मोठा वाव आहे. जिल्ह्यात पर्यटन सर्कीट निर्माण झाल्यास यातून जिल्ह्याचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

जिल्हा उद्योग केंद्रातर्फे उद्योजकांसाठी २२ प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. यातील अनुदान, मदत, कर्ज परतफेड, व्याज सवलती आदी योजनांचा लाभ घ्यावा. जिल्ह्यातील आठ औद्योगिक क्षेत्रात १ हजार १८१ उद्योजकांना जमिनी वाटप करण्यात आल्या आहेत. जागा घेताना उद्योजकांनी गांभिर्यपूर्वक उद्योग सुरू करावे. घेतलेले कर्ज परतफेड होईल, याची दक्षता घ्यावी. उद्योग विकासाला पूरक वातावरण होण्यासाठी चेंबर ऑफ कॉमर्स स्थापन करण्यात यावे. यातून उद्योजकांना फायदा होण्यास मदत मिळेल.

परिषदेत श्री. चांडक यांनी उद्योजकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा सांगितल्या. श्री. पोटे यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाची माहिती दिली. श्री. इंगळे यांनी बचतगटांच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. इश्वेद बायोटेकचे संजय वायळ यांनी उद्योगाविषयी माहिती दिली. सुनील पाटील यांनी उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली.

भाईजींची गुगली; मागणार नाही पण भाजपने उमेदवारी दिली तर लढू

बुलढाणा दि. १२ : लोकसभेच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना अद्यापही राजकीय पक्षांकडून उमेदवार निश्चिती झालेली नाही. त्यातच बुलढाणा लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजप आणि शिंदे गट शिवसेनेत उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू आहे. बुलडाणा अर्बन चे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांनी काल टाकलेली गुगली चर्चेत आली आहे. भाजपने स्वतःहून उमेदवारी दिली तर बुलढाणा लोकसभा लढू असा मानस त्यांनी व्यक्त केल्याने राजकीय तज्ञांच्या भुवया उंचावल्या आहेत.

सहकार क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेले आणि बुलडाणा अर्बन चा नावलौकिक सामाजिक उपक्रमातून देशभर पसरवलेले राधेश्याम चांडक यांनी भाजपकडून लढण्याचा मानस जाहीर केला.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघ हा भाजप - शिवसेना युतीमध्ये शिवसेनेकडे राहिला आहे. मात्र शिवसेनेची दोन गटात विभागणी झाल्यानंतर भाजपने शिंदे गट शिवसेनेकडून (विद्यमान खासदार असतानाही)हा मतदारसंघ आपल्या ताब्यात मिळावा यासाठी उघड हालचाली केल्या आहेत. एवढेच नव्हे तर केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचे अर्धा डझनावर दौरे देखील बुलढाणा जिल्ह्यात या निमित्ताने झाल्याचे लपून राहिलेले नाही. त्यातच निवडणूक तोंडावर आलेली असताना अद्यापही महायुती अथवा महाविकास आघाडी या दोन प्रमुख प्रतिस्पर्ध्यांकडून उमेदवार घोषणा अद्याप झालेली नाही. त्यामुळे तर्कवितर्क लढवल्या जात आहेत. अशातच काल राधेश्याम चांडक यांनी हा बुलढाणा लोकसभा मतदारसंघ आपण भाजपने स्वतःहून उमेदवारी दिल्यास लढायला तयार असल्याचे सांगितले आहे. भाजपचा विकासाचा मुद्दा लक्षात घेता आपण हा निर्णय घेतला असल्याचेही ते म्हणाले. जर तर च्या शक्यता पाहता असे झाल्यास यामुळे राजकारणाला वेगळी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे.

कॉस्मेटिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल कविता विधळे डायरेक्ट सेलिंग पुरस्काराने सन्मानित

दिल्ली येथे केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार विराट महिला उद्यमी संमेलन संपन्न

तिवसा दि.१२ : भारतात डायरेक्ट सेलिंग उद्योगामध्ये कॉस्मेटिक क्षेत्रात अनेक महिलांना स्वतःच्या पायावर उभं करून महिला सशक्तीकरणाचे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या भारतातील निवडक महिलांना दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर महिला दिनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये अमरावती येथील महिलांना उद्योगी बनविण्यासाठी झटणाऱ्या कविता विधळे यांना केंद्रीय मंत्री महोदयांच्या हस्ते डायरेक्ट सेलिंग मधील सर्वोच्च अवॉर्ड ने सन्मानित करण्यात आले.

संपुर्ण भारतामधून ज्या महिलांनी महिला सशक्तिकरण व महिलांना स्वावलंबी बनवून स्वयंरोजगाराकडे नेण्याचे समाजामध्ये कार्य केले,अश्या महिलांना दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले. अश्या कार्यात अग्रेसर असलेल्या अमरावती येथील सौ.कविता विधळे यांना ब्युटी आणि कास्मेटिक्स एक्सलेंस अवार्ड ने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

महिला दिनी केंद्र सरकारच्या ऐडईसआय, सीऐआयटी, फडईएसए या संस्थेने दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर विराट महिला उद्यमी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संपुर्ण भारतामधून २५ हजाराच्यावर महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या. केंद्रीय मंत्री पियुष गोयल, स्मृती इराणी, तिन्हीही संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार, पंकज खंडेलवाल, रेड्डी आदीं मान्यवरांच्या उपस्थितीत महिला सशक्तिकरण, स्वयंरोजगार आदीं महिल्यांचा हितैशी कार्यात ज्या भगिनींचे भरीव योगदान आहे, अश्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कविता विधळे यांनी महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हायजिन कॅम्प, महिलासाठी बचतगटाच्या माध्यमातून वस्तु विक्रींची मार्केटिंग,महिलांना उद्योजक बनण्याचे धडे आदीं भरीव कार्य केले व करित आहेत. अंबानगरीच्या लेकीचा दिल्लीत सन्मान ही खुप मोठी गौरवशाली व अजून महिलांसाठी कार्य उर्जा मिळाली,अशी प्रतिक्रिया सौ. कविता विधळे यांनी दिली. यावेळी योगिता फाले, सपना फाले, पूनम शेंडे, भावना रवाळे यांच्यासह आदींची दिल्ली येथील संमेलनात उपस्थीती होती.

अ.भा.ग्रा.पत्रकार संघ महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी घोषित प्रदेश सल्लागार पदी कांचन मुरके यांची निवड

अमरावती दि १२ : अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश कार्यकरिनी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात घोषित करण्यात आली.अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची केंद्रिय मुख्य पदाधिकार्यांनी ऑनलाईन बैठक घेऊन महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी घोषित केली.या बैठकीला केंद्रीय संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने,केंद्रीय कर्याधक्ष्य युसुफ खान,केंद्रीय महासचिव सुरेश सवळे ,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख ,केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे,केंद्रीय सचिव अशोक पवार,केंद्रीय कोष्याध्यक्ष्य अशोकराव याऊल, प्रा.रवींद्र मेंढे,संजय कदम,प्रदीप जोशी, माणिक ठाकरे,बाळासाहेब सोर्गिवकर,अंबादास सिनकर,केंद्रीय सदस्य जयश्रीताई पंडागरे,ऑनलाईन बैठकीला उपस्थित होते.यामधे सर्वानुमते चर्चा करून खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये पत्रकार संघाच्या महाराष्ट्र प्रदेश सल्लागार म्हणून शहरातील लेखिका तसेच पत्रकार कांचन मुरके यांची निवड करण्यात आली.ही घोषणा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख यांनी केली आहे. आपल्या लेखणीतून रोखठोकपणे ज्वलंत विषय मांडणाऱ्या तसेच सामाजिक विषयांवर व्याख्यान करणाऱ्या कांचन मूरके या अनेक वर्षापासून अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाशी जोडल्या गेल्या आहेत.त्यांनी मला मिळालेल्या पदाचा सन्मान करून या पदावर मेहनतीने काम करत राहील असे बोलतांना सांगितले आहे.यावेळी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सर्पमित्र वनिता बोराडे मेहकर - बुलढाणा मीनाताई राहीज अहमदनगर मंगेश जोशी,भुसावळ जळगाव,महेंद्रकुमार संकलेचा,पैठण संभाजीनगर दिपक नायक वाघोली - पुणे,मदन भाटे चांदुर बाजार,महाराष्ट्र प्रदेश सचिव घनश्याम पालिवाल,चांदुर बाजार, राजेंद्र ठाकरे प्रदेश सचिव अमरावती, महाराष्ट्र प्रदेश सहसचिव सुरेशसिंग मोरे, दर्यापूर ,श्रीकृष्ण काकडे जानेफळ-मेहकर,बुलढाणा महाराष्ट्र प्रदेश संघटक दत्तप्रसाद आबिलवाडे संभाजीनगर, रमेश भिमराव पांडे गांव - टाकेद खुर्द ता.ईगतपुरी. जि.नाशिक, गणेश सुरजोसे हिवरखेड अकोला,गोपाल सरनायक हिंगोली अजय टप मलकापूर , बुलढाणा प्रशांत देशमुख, आटपाडी - सांगली, रवी गोरे - कुन्हा, मुक्ताईनगर जळगांव खा, सुनिल चौधरी - धुळे, मनोहर मुरकुटे, अंजनगाव आकाश काशिकर, दिग्रस - यवतमाळ, ज्ञानेश्वर शेवाळे, कराड - सातारा, योगेश हजारे, खामगांव - बुलढाणा, सागर सवळे, चांदुर बाजार महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख रविंद्र तिराणिक चंद्रपूर,वसंतराव देशमुख-जालना, सुरज दाहाट अमरावती, पप्पू कंधारे मुळशी-पुणे, मनोज कमटे,मुदखेड नांदेड गणेश पाटील मोताळा-बुलढाणा, महाराष्ट्र प्रदेश सल्लागार राजेंद्र माळवे नाशिक राजेंद्र बिरला नांदेड, मुनीर खान मुंबई,धनंजय किर्तने मोहन नगर ,जळगाव.खा, डि. भास्कर. हिवरा आश्रम - बुलढाणा प्रदेश.विधीसल्लागार, श्री. किशोर बादल पुणे, नवनीतकुमार जोजारे, संभाजीनगर, श्री. शरद बादल, वाघोली -पुणेमहाराष्ट्र प्रदेशकार्यलय प्रमुख सचिन ढोके अमरावती मंगेश राजनकर जळगांव(जा) बुलढाणा महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्ध प्रमुख शहजाद खानचांदुर रेल्वे , जिल्हा अमरावती नितीन अशोकराव पवार कुन्हा,अमरावती महाराष्ट्र प्रदेश सदस्य डॉ. संजय जेवडे नांदगाव खंडेश्वर- उत्तमराव गावडेचांदुर रेल्वे- अमरावती सुरेशराव ढवळे,नांदगाव खंडेश्वर जानराव मनोहर तिवसा सुमित हरकुट चांदूर बाजार डॉ.मेघराज कोचर,शिरजगाव मोझरी अशोक वस्तानी अचलपूर परतवाडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या निवडीमुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

युवकांनी कुठल्याही प्रकारच्या ध्रुवीकरणाला बळी न पडता मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन लोकशाही बळकट करावी : डॉ. विजयकुमार एम. गवई

अमरावती दि. १२ : राष्ट्रीय सेवा योजना श्री वसंतराव नाईक महाविद्यालय धारणी च्या वतीने महाविद्यालयात जागतिक मतदार दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. गवई यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाने मतदान जनजागरण रॅली,'चर्चात्मक मार्ग मार्गदर्शन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली तसेच कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांनी मतदानात सहभागी होण्यासाठी व मतदानास इतरांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रार्थना घेण्यात आली. दिनांक २३/०२/२०२४ रोजी विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्त ग्राम शिरपूर येथे मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. जनजागृती सप्ताहाच्या शेवटी दिनांक ६/०३/२०२४ रोजी एक दिवशीय कार्यशाळेत डॉ. गवई सरांनी स्वयंसेवकांना व विद्यार्थ्यांना जाती धर्माच्या पलीकडे जाऊन देशाच्या विकासासाठी लोकशाहीचे बळकटीकरण करावे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ. एम. ए. पवार यांनी कुठल्याही भूलथापांना बळी न पडता मतदान करावे असे मार्गदर्शन केले तसेच प्रा. विकास देशमुख यांनी आपल्या मतदानाचे महत्व पटवून दिले. कार्यशाळेत निवडणूक आयोगाचे नियम, आचार संहिता, विद्यार्थ्यांनी नवीन मतदार नोंदणी बद्दल माहिती, मतदान कसे करायचे इत्यादी विषयावर होणारा चर्चेत सहभाग घेतला आणि रॅली मध्ये राष्ट्रीय सेवा योजना चे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला व साप्ताहिक कार्यक्रमांचा शेवट हा 'मेरा वोट देश के लिए' या संकल्पनेतून मतदार व मतदान जनजागृती शपथविधीने झाला. या कार्यक्रमाला प्रा. डी. एल. मस्के, प्रा. अतुल नाईकवाडे, प्रा. डॉ. मधुसूदन बेले, प्रा. बी. आर. भोसले, श्री आनंद नांदुरकर इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी प्रा. अहमद शेख महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. पल्लवी इंगोले व सहा.कार्यक्रमाधिकारी प्रा.जितेंद्र तायडे व डॉ. आर एस पाटील उपस्थित होते.

अमरावती येथे दुसऱ्या छत्रपती शिवराय युवा विचार कृती संमेलनाचे आयोजन

राज्यस्तरीय घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धा बक्षीसं वितरणही होणार



अमरावती दि. १२ : शिवरायांच्या विचारांची ज्योत कायम चेतविण्यासाठी व त्याची एकसंघ मांडणी करण्यासाठी आम्ही सारे शिवप्रेमी व समविचारी संघटनांच्या वतीने छत्रपती शिवराय युवा विचार कृती संमेलनाचे व राज्यस्तरीय घरगुती शिवजयंती सजावट स्पर्धा बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन शनिवार दि १६ मार्च रोजी सकाळी १०.०० वा.कांचन रिसोर्ट , वलगाव रोड अमरावती येथे केले आहे.

छत्रपती शिवराय युवा विचार कृती संमेलनाचे उदघाटन सकाळी १० वाजता होणार असून,यावेळी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा.प्रवीण देशमुख(सुप्रसिद्ध वक्ते),उदघाटक म्हणून युवराज जेधे(स्वराज्य सेनानी कान्होजी जेधे यांचे १४ वे वंशज)मंगेश शिळीमकर (वीर हैबतराव शिळीमकर यांचे १४ वे वंशज)तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री तथा आमदार मा.ऍड.यशोमती ठाकूर, स्वागताध्यक्ष सुधीर वाकोडे (अध्यक्ष श्रीमंतयोगी एज्यूकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, अम),सह स्वागताध्यक्ष कांचनउल्हे (संचालिका कांचन रिसोर्ट,अम), प्रमुख उपस्थितांमध्ये अविनाश कोठाळे (अध्यक्ष जिजाऊ बँक,अम),अरविंद गावंडे(प्रदेश उपाध्यक्ष, म.से.सं),सीमा बोके (प्रदेशाध्यक्षा जिजाऊ ब्रिगेड, महाराष्ट्र राज्य),डॉ सुदर्शन तारख(प्रदेश संघटक संभाजी ब्रिगेड ,महाराष्ट्र राज्य),प्रा विजय काळे (प्रा.राम मेघे इंजि कॉलेज, अम), अश्विन चौधरी(अध्यक्ष मराठा से संघ,अम), प्रा आशिष देशमुख (अध्यक्ष सूर्योदय सा. प्रतिष्ठान,दर्यापूर), मनोहर कडू (माजी उपजिल्हाधिकारी, अमरावती) हे राहणार आहेत. यावेळी पहिल्या शिवसंवादाचा विषय शिवकालीन व्यवस्थापन व आजचा युवक हा आहे. शिवसंवादाचे अध्यक्ष प्रा गजानन देशमुख (अध्यक्ष, शिवराज्याभिषेक महोत्सव समिती,रायगड विदर्भ), असून प्रमुख वक्त्यांमध्ये सुबोध धुरंधर , जीवन गावंडे,अक्षय राऊत,निलेश सोनटक्के आहेत तर प्रमुख उपस्थितांमध्ये प्रा मनीष पाटील व दिनेश ठाकरे असतील.

दुसरा शिवसंवाद छत्रपती शिवरायांचे स्त्री विषयक धोरण व आजची स्त्री या विषयावर आहे. सत्र अध्यक्ष म्हणून मयूरा देशमुख(आंतरराष्ट्रीय अध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड) ,प्रमुख वक्ते म्हणून सीमा बोके, मनाली तायडे,कीर्ती काळमेघ- वनकर ,सौ इंजि पल्लवी चौधरी-वानखडे आदी वक्त्या आहे.तसेच राज्यस्तरीय घरगूती शिवजयंती सजावट स्पर्धाचा बक्षीस वितरण समारंभ होणार असून समारोपीय कार्यक्रम राष्ट्रीय खंजिरी भजनाने होणार आहे.यावेळी प्रा प्रवीण देशमुख अध्यक्ष तर पवनपाल दवंडे यांचे कीर्तन असणार आहे.

तसेच यावर्षीचा ' राज्यस्तरीय राष्ट्रवीर भगतसिंह स्मृती सन्मान पुरस्कार' नितीन देशमुख(सुप्रसिध्द कवी तथा गझलकार) यांना मिळणार आहे.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य संयोजक तथा संकल्पना छत्रपती शिवराय युवा विचार कृती संमेलनाचे मुख्य संयोजक डॉ.तुषार देशमुख,प्रा प्रेमकुमार बोके,प्रा मनाली तायडे, डॉ हर्षा ढोक, लीनता पवार,शरद काळे, निखिल काटोलकर, सुमित रिठे, अजित काळबांडे यांनी केले आहे.

काशीबाई अग्रवाल विद्यालयात विद्यार्थ्यांची ऑनलाईन बचत बँकेची स्थापना

(अनंत बोबडे)

येवदा दि. १२ : येवदा येथील काशीबाई अग्रवाल विद्यालय व भाऊसाहेब देशमुख उ.मा. विद्यालयलयात काळाची गरज लक्षात घेता व विद्यार्थ्यांना नेट बँकिंग व्यवहार समजणे आवश्यक आहे याकरिता शाळेचे शिक्षक सुमित वानखडे यांच्या प्रयत्नातून वर्ग ५ते ७ च्या विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांसाठी स्वतःची बँक स्थापन केली त्यांच्या या कार्याचे शाळा प्रशासनाकडून व पालकांकडून अभिनंदन केल्या जात आहे,

शाळेचे प्राचार्य एन एन बोरोळे व येवदा शिक्षण संस्थेचे संचालक तथा क्रीडा शिक्षक मनोज देशमुख अनुपमा देशमुख पर्यवेक्षक अथर यांचे मोलाची सहकार्य लाभले याप्रसंगी अर्थशास्त्र विषय शिक्षक प्रा किशोर थोटे यांनी विद्यार्थ्यांना बँकेच्या आर्थिक व्यवहाराविषयी माहिती सांगितली

बँकिंग व्यवहार सुरळीतपणे चालू राहण्यासाठी व्यवस्थापक - तनवी कंकाळे, बचत खाते प्रमुख - तनुश्री मोहोळ, कॅशियर - सुयोग नाळे, लेखनीस - राज कुटाफळे हे विद्यार्थी बँकेचे व्यवहार सांभाळतात यासाठी त्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या शिक्षकांकडून कौतुक केल्या जात आहे,

चिखलदरा आयटीआय मध्ये महिला दिन संपन्न

अमरावती, दि. ८ : आजच्या युगात महिला शिक्षण, उद्योग-व्यवसाय, नोकरी यासह सर्वच क्षेत्रात अग्रेसर होत आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिन हा एकच दिवसाकरिता मर्यादित न राहता, स्त्री शक्तीचा सन्मान व तिच्या प्रोत्साहनासाठी संपूर्ण वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात यावे, असे प्राचार्य ए. एस. काळे यांनी आज येथे सांगितले.

जागतिक महिला दिनानिमित्त आज चिखलदरा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्येच्या आराध्य देवता सरस्वती माता, राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस प्राचार्य व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाला आरोग्य विभागाच्या अधीक्षिका सौ. पुनम खोडसकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. तसेच आयटीआयचे निदेशक

श्री. मारशीटवार सर, श्री. देशमुख सर, श्री मस्के सर, दांडगे सर, श्री. डोंगरे सर, श्रीमती चौधरी मॅडम, श्रीमती पाटबागे मॅडम यांच्यासह आयटीआय संस्थेचे सर्व ट्रेडचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. जागतिक महिला दिन साजरा करण्यामागची भूमिका आणि महत्व याबद्दल निदेशक श्री. मस्के यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली. कु. मयुरी खडके व कु. अश्विनी खडके या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर श्रीमती चौधरी मॅडम यांनी आभार मानले.

अनेकांत महिला मंडळ तर्फे स्मार्ट सखी मी कार्यक्रमाचे आयोजन

अमरावती दि. १२ : जागतिक महिला दिनानिमित्त अनेकांत महिला मंडळ अंजनगाव सुर्जी येथे स्मार्ट सखी मी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत १५ महिला सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धात ६ फेऱ्या घेण्यात आल्या . स्व परिचय,वेळेवर दिलेल्या विषयावर मनोगत व्यक्त करणं, विविध क्षेत्रातील व धार्मिक क्षेत्रातील प्रश्न,गेम,वेळेवर डीश सजविणे या सर्व फेऱ्या यशस्वी पणे पार करून स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ संगीता नितीन खंडारे,द्वितीय क्रमांक सौ दक्षा आशिष खंडारे व तृतीय क्रमांक सौ कार्तिकी मनिष संगई यांचा आला.या स्पर्धेचे परिक्षण सौ.अर्चनाताई पखान व सौ. मधुराताई लेंधे यांनी केले. महिला दिनानिमित्त परिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन सौ समता देवलसी व सौ शुभांगी खंडारे यांनी केले, परिक्षकांचा परिचय अनेकांत महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ प्रज्ञा संजय संगई यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन सौ. सुनंदा डाखोरे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व महिलांनी सहकार्य केले.